# भारतीय जनता पक्ष
(केंद्रिय कार्यालय)
11, अशोक रोड, नवी दिल्ली- 110001
फोनः 011-23005700, फॅक्स- 011-23005787

भाजपच्या राष्ट्रीय प्रवक्ता श्रीमती निर्मला सितारामन यांचे प्रसिद्धिसाठीचे वक्तव्य

कॉंग्रेस संसदीय समितीच्या कामगीरीत अनेक अडचणी उभ्या करण्यात येत आहेत त्याबद्दल भाजप नापसंती दर्शवत आहे. याआधीच कॉंग्रेसने पब्लिक अकाउंट कमिटीच्या (पीएसी) कामगीरीत विघ्न टाकले होते.

टू-जी स्पेक्ट्रम वाटप घोटाळयाच्या तपासासाठी संयुक्त संसदीय समिती(जेपीसी) च्या रचनेसाठी कॉंग्रेस पक्षानेच विरोध दर्शवला होता,ते संपूर्ण देशाने पाहिले. युपिए सरकारच्या अनेक मंत्र्यांनी असे वक्तव्य केले होते की, घोटाळयाबाबत विविध न्यायालयात केस चालू असल्याने जेपीसीची रचना करण्याची काहीच आवश्यकता नाही. त्या प्रक्रियेत संसदेचे संपूर्ण सत्र (वर्ष 2011 चे शीत सत्र) गमावण्यात आले होते.

सर्वोच्च न्यायालयाने युपीए सरकारकडून वाटप करण्यात आलेले 122 परवाने रद्द केले ते सर्वांनाच माहित आहे.

सरकार जनतेच्या दबावाखाली झुकून आणि मोठ्याप्रमाणात झालेल्या भ्रष्टाचाराला लक्षात घेऊन नंतर जेपीसीची रचना तर केली, परंतु घोटाळयाच्या तपासात सहयोग देण्याऐवजी तिच्या कामगीरीवर दबाव आणत आहे. वारंवार जेपीसीच्या कामगीरीत दखल दिल्याबद्दल भाजप सदस्यांनी प्रश्न उठवले आहेत. त्यानंतरही घोटाळयाचा मुख्य सूत्रधार ए.राजा यांना जेपीसी समोर जबानी साठी बोलावण्याची मागणी करण्यात आली, ती जेपीसीच्या अध्यक्षांनी फेटाळून लावली. खरे तर संसदीय समिती सर्वसंमतीने कामगीरी बजावते.

संसदेच्या इतिहासात समितीच्या समोर मंत्र्यांची जबानी घेण्यात आली हे भुतकाळात पण झाले आहे. डॉ.मनमोहन सिंह वर्ष 1992 मध्ये जेपीसी समोर उपस्थित राहिले होते. अशाचप्रकारे भाजपचे यशवंत सिन्हा हे सुद्धा जेपीसी समक्ष हजर राहिले होते.

बुरारी येथे 2011 साली आयोजित कॉंग्रेस महासमितीच्या अधिवेशनात पंतप्रधानांनी पब्लिक अकाउंट

कमिटी समोर उपस्थित राहण्याचा तयारी दर्शवली होती. सर्वांना माहीत आहे की जाहीर हिशेब समिती पंतप्रधानांना जबानीसाठी बोलावणार नाही.

जेपीसीची स्थापना ज्या उद्दीष्टासाठी करण्यात आली ते उद्दीष्ट साकार करणे हे तिच्या सदस्यांची संसदेप्रती जबाबदारी बनते. ए राजाने जेपीसी समक्ष जबानी द्यायला पाहिजे, अशी मागणी फेटाळण्यात आली. श्री राजा वारंवार असे सांगत आहेत की त्यांनी स्वतः घेतलेल्या निर्णयासाठी पंतप्रधान आणि अर्थमंत्री पण जबाबदार आहेत. त्या व्यतिरिक्त भारताचे ऍटर्नी जनरल श्री वहाणवटी यांनी अशाप्रकारे युक्तिवाद केला होता की टु-जी ची फाईल क्लीयर केल्यानंतर ए राजा यांनी त्यांच्यावर एक वाक्य लिहिले होते. तो मुद्दा अनेक प्रश्न उपस्थित करत आहे. या सर्व बाबी लक्षात घेता अर्थमंत्री आणि विदेश मंत्री राहिलेले यशवंत सिन्हा कित्येकदा जेपीसीच्या अध्यक्षांचे त्या मुद्द्याकडे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतरही त्यांनी पंतप्रधान आणि स्पीकर यांना उत्तर दिले नाही.

भाजप अशी मागणी करत आहे की पंतप्रधान, ज्यांनी त्या कालावधीत अर्थमंत्रालयाचे खाते सांभाळले होते त्यांनी जेपीसी समोर निवेदन केले पाहिजे.

ए.राजाच्या जबानी साठी पण मंजुरी देण्यात यावी.

जेपीसी चा तपास निष्पक्ष, न्याय्य आणि वाजवी रित्या पुढे जावा अशी पावले उचलण्यात आली पाहिजेत.

**(ओ.पी.कोहली)**

हेडक्वार्टर इन्चार्ज